नि.दि.दा.क्र.२६३/२०१३
बाबूराव वि. रमेश
नि.क्र.२३९

प्रतिवादी यांच्या तर्फे सा.क्र.४

वादीकरिता उलट तपास विधीज्ञ श्री.पी.जी.जवळगेकर यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू

६. खरेदीखत ज्या साली झाले ते साल मला माहित नाही. खरेदीखत मी पुर्वी वाचले होते. खरेदीखत (नि.क्रं.१२८) मध्ये रु.५०,०००/- च्या हमी पोटी गहाण स्वरुपी करुन दिले आहे असे लिहिलेले आहे. खरेदीखत (नि.क्रं.१२८) मला आता दाखविले, त्या मध्ये ते रु.५०,०००/- च्या हमी पोटी गहाण स्वरुपी करुन दिले आहे असे लिहिलेले नाही. खरेदीखत (नि.क्रं.१२८) वर मी साक्षदार म्हणून सही केली आहे. अभियंता या नात्याने मी कोणताही कागद वाचल्यानंतरच त्यावर सही करतो. वादी यांनी दावा मिळकतीच्या चारही बाजूस पोलीस संरक्षणात मोठा बांध टाकून घेतलेला आहे हे मी पाहिलेले नाही.

**प्रश्न** – प्रतिवादी रमेश पाटील तुमचे भाऊ आहेत का ?

**उत्तर** - ते रमेश सुर्यवंशी आहेत व मी जाधव पाटील आहे.

माझ्या कडे जाधव आडनावाचे माझे स्वत:चे आधार कार्ड आहे. माझे सर्व शिक्षण जाधव याच आडनावाने झाले आहे.

**प्रश्न-** तुमचे जाधव आडनाव असल्याचे वकीलांना तुम्ही सांगितले होते का ?

**उत्तर** - माझा शेती संबंधीत सर्व कागदोपत्री अभिलेख पाटील या आडनावाने आहे व माझे शैक्षणिक कागदपत्र जाधव या आडनावाने आहेत.

माझे सरतपास शपथपत्र तयार करत असताना मी पाटील आडनावाचे माझे आधार कार्ड दाखविले होते.

**प्रश्न-** तुम्ही जाधव व पाटील या दोन्ही आडनावाचे आधार कार्ड दाखल करु शकता काय ?

**उत्तर** - पाटील आडनावाचे एकच आधार कार्ड, पॅनकार्ड व मतदान कार्ड मी दाखल करु शकतो, जाधव आडनावाचे शैक्षणिक कागदपत्र मी दाखल करु शकतो.

आधार कार्ड काढण्यासाठी शैक्षणिक कागदपत्र दयावे लागतात हे म्हणणे खरे आहे. मी

शासनाची फसवणूक करुन पाटील आडनावाचे माझे आधारकार्ड काढून घेतले हे म्हणणे खरे नाही. मी सफायतीदारपणे, कुठलाही आधार नसताना खोटे कागदपत्र तयार करतो हे म्हणणे खरे नाही.

७. पाटील पदवी एकाच व्यक्तीस गावात मिळते हे म्हणणे खरे नाही. खरेदीखत नोंदणी करण्याच्या दिवशी मी हजर होतो. खरेदी-विक्री ठरावासाठी मी हजर नव्हतो, साक्षीदार स्वत: सांगतात खरेदी-विक्रीचा ठराव नव्हता. वादीने प्रतिवादीस कोणताही ठराव केव्हाही करुन दिला नाही, साक्षीदार स्वत: सांगतात दावा मिळकत परतीची चर्चा होती. मी गावनकाशा पाहिला आहे. माझ्या जमिनीच्या पुर्वेस- रमेश शेळके यांची जमिन, पश्चिमेस- शासकीय पाणंद, दक्षिणेस- गाव वस्ती व उत्तरेस- सरकारी निटूर महामार्ग.

**प्रश्न-** तुम्ही दावा मिळकतीचे शेतशेजारी नाहीत ?

**उत्तर-** रमेश पांडूरंग शेळके, व्यंकट शेळके, विजयकुमार शेळके व बाबूराव शेळके या सर्वांची शेती एकाच सर्वे क्रंमाकामध्ये आहे. त्याचा सर्वे क्रंमाक मी सांगू शकत नाही. त्याचा सर्वे क्रंमाक मी पाहून सांगू शकतो.

**वादी यांच्या विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील उलटतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.10.30 11:28:16 +0530

(रवि वि.पांडे)

दि.२९/१०/२०२५

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
निलंगा, जि.लातूर